RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ७७(४)] शुक्रवार, जून १४, २०१९/ज्येष्ठ २४, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १८५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त), नियम व आदेश.**

**पर्यावरण विभाग**

१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ जून २०१९

**अधिसूचना**

क्रमांक प्लास्टीक-२०१९/प्र.क्र. १७१/तांक-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत महाराष्ट्र शासनाद्वारे प्लास्टीक व थर्माकॉल इत्यादींपासून बनविलेल्या अविघटनशील वस्तूंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक यांचे नियम करण्याकरिता, दिनांक २३ मार्च २०१८ रोजी महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच दिनांक ११ एप्रिल २०१८, दिनांक ३० जून २०१८ च्या अधिसूचनेन्वये सुधारणा प्रसिद्ध करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी, सदर अधिसूचनेच्या परिच्छेद ८ नुसार भविष्यात या नियमनांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे वा अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन अंमलबजावणीमध्ये येणारे अडथळे वा त्रुटी यावर वेळोवेळी निर्णय घेणे इत्यादींसाठी व इतर अविघटनशील कचऱ्यावर नियमनाबाबत निर्णय घेण्यासाठी दिनांक २२ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये शक्तीप्रदत्त समिती गठीत करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी, प्लास्टीक उत्पादक संघटनांबरोबर झालेल्या चर्चेच्या व त्यांनी दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने शक्तीप्रदत्त समितीच्या दिनांक २८ मे २०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ या अधिसूचनेमध्ये काही सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली होती.

त्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम ४ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :—

१. दिनांक ३० जून २०१८ च्या अधिसूनेमध्ये परिच्छेद ४ च्या अनुक्रमांक (४) वगळण्यात येत असून त्यात खालील बाबी अंतर्भूत करण्यात येत आहेत :—

(१) अनुक्रमांक १ मध्ये बदल नाही.

(२) अनुक्रमांक २ मध्ये बदल नाही.

(३) अनुक्रमांक ३ मध्ये बदल नाही.

(४) अनुक्रमांक ३ मध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :—

उत्पादनाच्या ठिकाणी, उत्पादनाच्या प्रक्रियेदरम्यान अनिवार्य वेष्टनासाठी वापरण्यात येणाऱ्या बबल (Bubble) प्लास्टीकचा वापर करण्यास पुढील अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील :–

(अ) बबल (Bubble) पॅकेजिंगकरिता वापरण्यात येणारे प्लास्टीक हे कमीतकमी २० टक्के पुनर्चक्रीकरण असलेल्या प्लास्टीकपासून बनविणे बंधनकारक राहील.

(ब) बबल (Bubble) पॅकेजिंगकरिता वापरण्यात येणाऱ्या प्लास्टीकवर उत्पादकाचा तपशील, प्लास्टीकचा प्रकार (कोड क्रमांकासह), पुनर्खरेदी, मुद्रीत करणे बंधनकारक राहील.

(क) बबल (Bubble) पॅकेजिंगकरिता लागणारे प्लास्टीकचे उत्पादन करणारे उत्पादक/उत्पादक संघटनेने उत्पादक दायित्व योजनेंतर्गत, कचरा वेचक/भंगारवाले, किरकोळ विक्रेता यांच्या सहभागाने (Bubble) प्लास्टीक कचऱ्याच्या पुनर्प्रक्रियेची केंद्र उत्पादक जबाबदारी संस्थेच्या (Producers Responsibility Organization) माध्यमातून उभारावी किंवा संकलित केलेल्या बबल (Bubble) प्लास्टीकची अधिकृत पुनर्चक्रित केंद्राद्वारे ६ महिन्यांत १०० टक्के विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील.

(५) अनुक्रमांक ५ मध्ये बदल नाही.

(६) अनुक्रमांक ६ मध्ये बदल नाही.

(७) अनुक्रमांक ७ मध्ये बदल नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनिल डिग्गीकर,**
शासनाचे प्रधान सचिव (पर्यावरण).

## ENVIRONMENT DEPARTMENT

15th Floor, New Administrative Building, Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 14th June 2019.

*NOTIFICATION*

No. Plastic-2019/C.R. No. 171/T.C.-1.—WHEREAS, under the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006, for regulating Manufacture, Usage, Sale, Storage, Transport of the products made from plastic and thermocol etc., the Government of Maharashtra published the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018 on 23rd March 2018, which was amended as per Notification dated the 11th April 2018 and 30th June 2018.

AND WHEREAS, as per the para 8 of the said notification, for implementation of these regulations and help in resolving any difficulty faced by implementing authorities during implementation and if required also carry out any amendment in these regulations, the Government *vide* Government Resolution dated 22nd March 2018 constituted the Empowered Committee.

AND WHEREAS, the Empowered Committee in its meeting of the held on 28th May 2019 resolved to make amendments in the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018.

NOW THEREFORE, in exercise of the powers conferred by Clause (1) and (2) of Section 4 of the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006, the Government of Maharashtra hereby makes following amendments in Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018.

1. In the Notification dated 30th June 2018 in Clause 4 of Para 4 is deleted and the following items are inserted :—

(1) Serial No. (1) shall be read as it is.

(2) Serial No. (2) shall be read as it is.

(3) Serial No. (3) shall be read as it is.

(4) Serial No. (4) is substituted as follows.

Bubble Plastic material used for wrapping the material at the manufacturing stage or is an integral part of manufacturing shall comply the following conditions :—

(*a*) Bubble plastic material shall be made up of minimum 20% recyclable plastic material.

(*b*) The bubble packaging material shall be printed with manufacturer's details, type of plastic with code number and buyback price.

(*c*) The manufacturers/manufacturer's association using bubble plastic material for packaging shall work together and create a buy-back mechanism and diligently implement their Extended Producer's Responsibility (EPR) Plan whch includes co-ordination/collaboration with existing Rag Pickers/Scrap Traders, retailers for collection of bubble plastic waste and its subsequent recycling and final disposal

through their own established recycling plant or registered recyclers by establishing Producer's Responsible Organisations, which shall be responsible for 100% integral bubble plastic waste management from collection to final disposal.

(5) Serial No. (5) shall be read as it is.

(6) Serial No. (6) shall be read as it is.

(7) Serial No. (7) shall be read as it is.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANIL DIGGIKAR,

Principal Secretary (Environment).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.